**(१) केंद्रीय शासन :**

साम्राज्याची संपूर्ण सत्ता शेरशहाच्या हाती केंद्रीत झाली होती. निरंकुश शासक असला तरी त्याने लोककल्याणाकडे लक्ष दिले. राज्याचे महत्त्वाचे निर्णय शेरशहा स्वत:च घेत असे. राजाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी चार मंत्री विभाग प्रमुख होते.

**दीवान–इ–वजारत** : ह्या विभागाचा प्रमुख वजीर होता. तो इतर मंत्र्यांवर देखरेख ठेवीत असे. वजीराला अर्थमंत्र्यांची जबाबदारी पार पाडावी लागे. ह्या विभागात शेरशहाला रूची होती. त्याचे कडक नियंत्रण ह्या विभागावर होते. मधूनमधून तो हिशोबांची चौकशी करीत असे.

**दीवान–इ–आरीज** : विभागप्रमुख आरीज–ए–मुमालिक म्हणजे सेनापती होता. सैन्यभरती, संघटन, सैन्यनियंत्रण, सैनिकांना वेतन वितरण, युद्धमोहिमा चालविणे इ. कामे सेनापतीची होती. शेरशहा स्वतः कुशल सेनानी असल्याने ह्या खात्यावर त्याचे पूर्ण नियंत्रण होते.

**दीवान–इ–रसालत** : ह्या विभागाचा प्रमुख म्हणजे परराष्ट्र मंत्री होय. विदेशात जाणाऱ्या व तेथून येणाऱ्या राजदूतांशी संपर्क ठेवणे, कूटनीतीक पत्रव्यवहार करणे इ. कामे ह्या खात्याकडे होती.

**दीवान–इ–इन्शा** : शाही घोषणा व आज्ञा ह्यांचे लिखाण करणे, प्रांतीय व स्थानीय अधिकाऱ्यांबरोबर पत्रव्यवहार करणे तसेच सरकारी दप्तर सांभाळणे ह्या विभागाकडे होते.

ह्याशिवाय दीवान–ए–काजा म्हणजे केंद्र न्यायालय होते. त्याचा प्रमुख काजी असून तो प्रांतीय काजींवर देखरेख ठेवीत होता. दीवान–ए–वरीद नावाच्या खात्याकडे गुप्तहेर व्यवस्था होती. त्याचा प्रमुख वरीद–इ–मुमालिक असून राज्यातील महत्त्वाच्या बातम्या मिळविणे व डाकव्यवस्थेवर लक्ष देणे ही त्याची कामे होती. राजाच्या वैयक्तिक कामासाठी व राजमहालातील सेवकांवर देखरेख ठेवण्यासाठी एक स्वतंत्र विभाग होता.

**(२) प्रांतीय व स्थानीय शासन :**

राज्यकारभाराच्या दृष्टीने साम्राज्यात अनेक प्रांत होते. प्रांताच्या प्रमुखास राज्यपाल म्हणत. त्याच्याजवळ लष्कर राहत होते. प्रत्येक प्रांत सरकारमध्ये विभाजित झालेला होता. सरकार ह्या विभागावर दोन अधिकारी होते. प्रमुख शिकदार (शिकदार–ए–शिकदारान) हे अत्यंत महत्त्वाचे पद होते. त्याच्याजवळ छोटेसे सैन्य असून आपल्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था ठेवण्याची

Scanned by CamScanner

त्याची जबाबदारी होती. बंडखोर जमीनदारांवर नियंत्रण ठेवणे, परगण्यांवर देखरेख ठेवणे ही त्याची कामे होती. प्रमुख मुन्शी (मुन्सिफ-ए -मुन्सिफान) म्हणजे न्यायाधीश होता. ह्याशिवाय सरकारवर देखरेख करण्याचे कार्यही त्याच्याकडे सोपविण्यात आले.

सरकारचे लहान विभाग म्हणजे परगणा होय. प्रत्येक परगण्यात एक शिकदार, एक अमीन, एक पोतदार व दोन कारकून हा अधिकारी वर्ग असे. शिकदार हा सैन्याधिकारी असून परगण्यात शांतता ठेवण्याचे त्याचे काम होते. अमीन जमिनीची व्यवस्था व करवसुली पाहत असे. पोतदार म्हणजे कोषाधिकारी होता. दोन कारकुनांपैकी एक फारसीत व दुसरा हिंदीत हिशोब लिहिण्याचे काम करी. ग्रामीण जनतेचा आत्मनिर्णयाचा अधिकार शेरशहाने मान्य केलेला होता. प्रत्येक गावात एक पंचायत असे. वयस्क आणि हुशार लोक त्याचे सदस्य राहत. गावाचे संरक्षण करणे, प्राथमिक शिक्षण, न्याय, स्वच्छता ही कामे पंचायतीकडे होती.

**(३) सैन्यव्यवस्था :**

स्वतः शेरशहा कुशल सेनानी असल्याने श्रेष्ठ सैन्य संघटनाचे महत्त्व त्याने जाणले. भारत व अफगाणिस्थानातील अफगाणांना त्याने बोलाविले. त्यामुळेच त्याच्या सैन्यात अफगाणांचे संख्याबळ जास्त होते. महत्त्वाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती स्वतः शेरशहा करीत असे. सैनिकांच्या भरतीवर त्याचे पूर्ण नियंत्रण होते. प्रत्येकाला योग्यतेनुसार रोख वेतन दिले जाई. घोड्यांची अदलाबदल टाळण्यासाठी त्याने घोड्यांना डाग देण्याची प्रथा सुरू ठेवली. प्रत्येक सैनिकाचे वर्णन कागदोपत्री लिहून ठेवले जाई. ह्यामुळे सैन्यातील दोष नाहीसे होऊन ते अधिक शक्तिशाली बनले. शेरशहाच्या सैन्यात शिस्त होती. त्याचे आपल्या सैन्याधिकाऱ्यांवर पूर्ण नियंत्रण होते. योग्यतेनुसार बढती देण्यात येई. शेरशहाच्या सैन्यात घोडेस्वार जास्त होते. पायदळाजवळ बंदुका असत. शेरशहाने मोठा तोफखाना बाळगला होत. राजधानीत दीड लाख घोडेस्वार, २५ हजार पायदळ व ३०० हत्ती सदैव तयार असत. ह्याशिवाय राज्यात महत्त्वाच्या ठिकाणी सैन्य ठेवलेले होते. तेथे योग्य व अनुभवी सेनापती होते. एका वर्णनावरून असे दिसते की, शेरशहाने ग्वाल्हेर, बयाना, रणथंभोर, चितोड, मांडू, रायसीन, चुनार, पूर्वेकडील रोहतासगड ह्या ठिकाणी सैन्य ठेवले. त्याच्या जोडीला तोफखाना व बंदुकदल असे.

**(४) आर्थिक सुधारणा :**

आपल्या जमीन महसुलाच्या नवीन पद्धतीसाठीच शेरशहा प्रसिद्ध आहे. ही त्याची पद्धती सुल्तानशाहीच्या काळापेक्षा उत्कृष्ट होती. आपल्या पित्याची जहागीर पाहत असताना शेरशहाला ह्याबाबतीत बराच अनुभव मिळाला. त्याने संपूर्ण जमिनीची दोरखंडाच्या साहाय्याने मोजणी केली. त्यानंतर उत्पन्नाच्या आधारावर जमिनीचे उत्कृष्ट, मध्यम व निकृष्ट असे तीन वर्ग पाडले. त्यांचे प्रतिबिघा उत्पन्न निश्चित करण्यात आले. त्यानुसार उत्पन्नाचा १/३ भाग सरकारी हिस्सा ठरविण्यात आला. हा कर नगद अथवा धान्याच्या स्वरूपात घेतला जाई. शेतकऱ्यांना जमीन सोपविताना त्यांच्याकडून महसुलासंबंधी करारपत्र करवून घेतले जात होते. अर्थात शेरशहाच्या साम्राज्यात जमीन महसुलाची ही पद्धती, कराचे प्रमाण सर्वच ठिकाणी सारखे नव्हते. त्यात

Scanned by CamScanner

प्रदेशानुसार भिन्नता होती. ह्याशिवाय जमीन-महसुलाच्या तीन पद्धती शेरशहाने अंमलात आणल्या. पहिली पद्धती बटाई होय. ह्याचे खेत-बटाई, लंक-बटाई आणि रास-बटाई असे तीन प्रकार होते. खेत बटाई म्हणजे शेतात पेरणी झाल्यावर किंवा उभे पीक शेतात असतांना शेतकरी व शासन ह्यांच्यात हिस्से वाटत होत असे. लंक-बटाई म्हणजे शेतातील पीक खळ्यात आणल्यानंतरची हिस्से वाटणी होय आणि रास-बटाई ह्याचा अर्थ धान्य साफ केल्यानंतर होणारी वाटणी. जमीन महसुलाची दुसरी पद्धती नश्क अथवा कनकूत होती. त्यात जमीनीचे उत्पन्न ढोबळमानाने लक्षात घेऊन त्यानुसार शेतसारा आकारला जाई. जमीन महसुलाची (शेतसारा, लगान, भूमीकर) तिसरी पद्धती नगदी किंवा जब्ती म्हणून ओळखली जाई. त्यात तीन किंवा जास्त वर्षांचा करार करून शेतकऱ्याला प्रतिबिघा ठराविक कर द्यावा लागत होता. त्याचा उत्पन्नाशी संबंध नव्हता.

सर्व पद्धतीत शेतकऱ्यांना नगदी पद्धतीच जास्त पसंत होती. वरील जमीन महसुलाशिवाय शेतकऱ्याला जमीन मोजणी शुल्क द्यावे लागत होते. त्याचे प्रमाण महसुलाच्या २¹/₂ ते ५% होते. दुष्काळाची सोय म्हणून शेतकऱ्यांकडून महसुलाच्या २¹/₂ % ह्या प्रमाणात धान्य वसूल केले जाई. शेतकऱ्यांच्या अडीअडचणीकडे शेरशहाने पूर्ण लक्ष दिले. शेतकऱ्यांशी नम्र व्यवहार करावा अशा अधिकाऱ्यांना सूचना होत्या. शेतकऱ्यांबरोबर दुर्व्यवहार करणाऱ्याला दंड केला जाई. सैनिकातर्फे पिकाला नुकसान पोहोचले तर शेरशहा त्याची भरपाई करून देत होता. राज्याचा मुख्य पाया आर्थिक आहे आणि भारत कृषिप्रधान देश असल्याने त्याची शक्ती शेतकऱ्यांवर अवलंबून आहे हे जाणूनच शेरशहाने वरील धोरण ठेवले होते. शेरशहाची ही महसूल व्यवस्था निर्दोष नव्हती. शेतकऱ्यांना जास्त कर द्यावा लागत होता. ह्याही क्षेत्रात भ्रष्टाचार होता. तरीही इतर शासकांच्या तुलनेत शेरशहाच्या कारकिर्दीत शेतकऱ्यांना फारसा त्रास नव्हता.

मुद्राव्यवस्थेत शेरशहाने काही सुधारणा केल्या. त्याने 'दाम' नावाचा नवीन चांदीचा शिक्का तयार केला. शिवाय १७५ ग्रेन चांदी असलेला रुपया अस्तित्वात आणला. तो १८३५ पर्यंत चलनात होता. डॉ. स्मिथ म्हणतात की, हा रुपया महणजे ब्रिटिश मुद्रा प्रणालीचा आधार होता. काही सोन्याचे शिक्केही शेरशहाने तयार केले. त्याने व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी त्यावरील कर कमी केले. व्यापारावरील कर हे राज्याच्या उत्पन्नाचे फार मोठे साधन होते. ह्याशिवाय उद्योगधंदे, लढाईतील लूट, बेवारस संपत्ती ह्यातून राज्याला भरपूर उत्पन्न मिळत होते.

**(५) न्यायव्यवस्था :**

शेरशहा न्यायप्रिय शासक होता. त्याने श्रेष्ठ न्यायव्यवस्थेची स्थापना केली. न्यायदानासाठी दर बुधवारी सायंकाळी त्याची कचेरी भरत असे. त्याच्या हाताखाली मदतीसाठी प्रमुख काजी राहत होता. जिल्ह्याच्या व प्रमुख नगरांच्या न्यायव्यवस्थेसाठी काजी होते. दिवाणी खटल्याचे काम जिल्ह्यात (सरकार) मुख्य मुन्शी आणि परगण्यात अमीन पाहत असे. न्यायक्षेत्रात शेरशहाने

Scanned by CamScanner

उच्च आदर्श निर्माण केले. दुर्बलांना, निर्धनांना अन्यायापासून वाचविले. तो निःपक्षपाती होता. त्याच्या उत्कृष्ट न्यायव्यवस्थेमुळे त्याची प्रजा निर्धास्त होती.

**(६) गुप्तहेर विभाग :**

ह्या बाबतीत शेरशहाने अलाउद्दीन खिलजीची पद्धती सुरू ठेवली. ह्या खात्याच्या प्रमुखास दरोगा-ए-डाकचौकी म्हणत. त्याच्या मदतीला समाचार लेखक व संदेशवाहक होते. शेरशहाचे हे खाते अत्यंत कार्यक्षम होते. त्यामुळे राज्यात होणारे विद्रोह, महत्त्वाच्या घटना, वस्तूंचे मूल्य इ. माहिती शेरशहाला शीघ्रतेने मिळत होती. शेरशहाला मिळालेल्या सफलतेत त्याच्या ह्या गुप्तहेर विभागाचा महत्त्वाचा वाटा आहे.

**(७) पोलीस विभाग :**

आपल्या साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था ठेवण्यासाठी शेरशहाने पोलीस विभागाचे उत्कृष्ट संघटन केले. मात्र त्यासाठी स्वतंत्ररीत्या अधिकारी नियुक्त न करता ती जबाबदारी राजकीय विभागांच्या प्रमुखाकडेच सोपविली. प्रांताची पोलीस व्यवस्था राज्यपालाकडे होती व सरकारची पोलीस व्यवस्था मुख्य शिकदार पाहत असे. शिकदार हा परगण्यातील पोलीस संघटनेचा प्रमुख होता. खेड्याच्या दृष्टीने ही व्यवस्था ग्रामप्रमुख (पाटील किंवा मुकद्दम) पाहत असे. आपापल्या विभागासाठी हे विभागप्रमुख जबाबदार धरले जात. त्यांच्या हाताखाली सैन्य होतेच. विशेषतः गुन्ह्यांचा तपास लावण्यासाठी ग्रामप्रमुखाची जबाबदारी महत्त्वाची होती. त्याला त्या परिसराची माहिती असल्याने गुन्ह्याचा तपास न लागल्यास त्याच्यावर कडक कारवाई होई. कधीकधी ग्रामप्रमुखास ठार करण्यात येत असे. ह्या कडक पोलीस बंदोबस्तामुळेच गुन्हेगारांवर शासनाचा वचक होता. त्यातून मग कोणीही सोन्याचे गाठोडे डोक्यावर घेऊन जावे अशा दंतकथा जन्मास आल्या. त्याचा अर्थ एवढाच की इतरांच्या तुलनेत शेरशहाची प्रजा निर्धास्त होती.

**(८) बांधकाम :**

शेरशहाने मोठमोठ्या सडका बांधून राजधानीचा अनेक भागांशी संबंध जोडला. बंगालमधील सोनारगांवपासून आग्रा, दिल्ली, लाहोर व सिंधपर्यंत एक सडक त्याने बांधली. डॉ. श्रीवास्तवांच्या मते, तिची लांबी ३००० मैल होती. तिला सडक-ए-आजम (रस्त्यांचा बादशहा) म्हणून ओळखीत. ह्याशिवाय आग्रा ते बऱ्हाणपूर, आग्रा ते जोधपूर, चित्तोड आणि लाहोर ते मुल्तान ह्या जुन्या रस्त्यांची शेरशहाने दुरूस्ती केली. ह्या रस्त्यांच्या बाजूला फळांची झाडे लावण्यात आली. शेरशहाने १७०० धर्मशाळा बांधल्या. प्रत्येक धर्मशाळेत विहीर व मशीद होती. मशिदीत एक इमाम, एक मुअज्जिन, एक शहना व चौकीदार राहत. त्यांचा खर्च त्या धर्मशाळेला दिलेल्या जमिनीतून होत असे. हिंदूसाठी प्रत्येक धर्मशाळेत एक ब्राह्मण राहत होता. हिंदू यात्रेकरूंना भोजन देणे, पाणी देणे, विश्रांतीची व्यवस्था करणे, घोड्यांना चारा देणे त्याचे कर्तव्य होते. धर्मशाळेत हिंदू व मुसलमानांसाठी स्वतंत्र कक्ष असत. ह्याशिवाय ह्या धर्मशाळा डाकचौकीचे केंद्रही होत्या. त्यादृष्टीने प्रत्येक धर्मशाळेत दोन घोडे तयार असत. महत्त्वाचा

Scanned by CamScanner